262


# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०८/०८/२०२४

# प्रेसनोट

उल्हासनगर शहर स्थापना दिनाचा ७५ वा वर्धापन दिन समारंभ दिनांक ०८ ऑगस्ट, २०२४ रोजी विराट अंब स्पोर्ट्स क्लब, तरण तलाव, महापालिका मुख्यालयामागे, उल्हासनगर-३ येथे मा.महापालिका प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला.

सदर कार्यक्रमाची सुरूवात मा.आमदार श्री. कुमार आयलानी यांच्या हस्ते दीप प्रज्वलाने करण्यात आली. जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे यांनी सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करून उल्हासनगर शहराची ऐतिहासीक पार्श्वभुमी व कार्यक्रमाची रूपरेषा थोडक्यात सांगीतली. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली, त्यामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येत असलेल्या विविध योजनांची त्यांनी थोडक्यात माहिती दिली. त्यामध्ये "माझी लाडकी बहीण, घरोघरी तिरंगा, जिल्हा कौशल्य विकास, अन्नपुर्णा, तिर्थयात्रा" यांचा प्रामुख्याने उल्लेख अतिरिक्त आयुक्तांनी केला.

मागील वर्षी १५ ऑगस्ट रोजी ३ कि.मी. लांबीच्या राष्ट्रीय ध्वजासह रॅली काढण्यात आली होती. सदर राष्ट्रीय ध्वजाची उत्तमरित्या निगा राखणारे श्री. आशिष यादव यांचा सत्कार मा.आमदार श्री. कुमार आयलानी व महापालिका आयुक्त डॉ. अझीझ शेख यांचे हस्ते करण्यात आला.

उप-आयुक्त डॉ. सुभाष जाधव यांनी "माझी लाडकी बहीण" योजनेबाबत थोडक्यात माहिती दिली. तसेच सदर योजनेचे अर्ज करतांना होणाऱ्या त्रृटी टाळणेबाबत त्यांनी सर्वांना आवाहन केले.

पर्यावरण विभाग प्रमुख सौ. विशाखा सावंत यांनी राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम (NCAP) अंतर्गत वृक्ष लागवडीसाठी विशेष उपक्रम (एक पेड माँ के नाम) या उपक्रमाची माहिती देवून पर्यावरण संवर्धनासाठी, हवा प्रदुषणास आळा बसावा, ऊर्जा संवर्धन, जलसंवर्ध याकरिता वृक्षांचे महत्व त्यांनी विषद करून यासंदर्भातील "हरीत शपथ" सर्व उपस्थितांसह घेण्यात आली. त्यानंतर नशामुक्ती अभियानावर एस.एस.टी.कॉलेज व एस.एच.एम. चे प्राचार्य व विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. तसेच "नशामुक्ती" व "घरोघरी तिरंगा" बाबत रॅलीचे आयोजन एस.एस.टी. कॉलेज व स्वामी हंसमुनी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केले.

मागील वर्षी १५ ऑगस्ट रोजी ३ कि.मी. लांबीच्या राष्ट्रीय ध्वजासह रॅली काढण्यात आली याची नोंद राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय रेकॉर्डमध्ये झाल्याबाबत महापालिका आयुक्त डॉ. अझीझ शेख यांचा सत्कार मा. आमदार श्री. कुमार आयलानी व रिजन्सी अ‍ॅन्टेलिया ग्रुपचे श्री. संजय अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच जनजागृती माहिमेत सहभाग घेतलेल्या १७ सामाजिक संस्था/महाविद्यालय/एनजीओ यांना प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. सर्व उपस्थितांना उद्यान विभागामार्फत "एक पेड माँ के नाम" या संकल्पनेतून विविध वृक्षांची रोपे वाटप करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. अझीझ शेख यांनी "माझी लाडकी बहीण, घरोघरी तिरंगा योजनेबाबत थोडक्यात माहिती दिली. तसेच येणाऱ्या श्रीगणेशोत्सवात पर्यावरणपूरक वस्तुंचा वापर करून, शाडूच्या मुर्तीची स्थापना घरोघरी व सार्वजनिक गणेश मंडळाने करण्याचे आवाहन आयुक्तांनी केले.

सदर कार्यक्रमास महापालिका प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख, अतिरिक्त आयुक्त श्री. किशोर गवस व जमीर लेंगरेकर, माजी उपमहापौर व आरपीआय जिल्हाध्यक्ष श्री. भगवान भालेराव, भाजपा जिल्हाध्यक्ष श्री. प्रदीप रामचंदानी, माजी जेष्ठ नगरसेवक श्री. जमनु पुरस्वानी, सिंधी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष श्री. महेश सुखरामनी, मुख्यलेखाधिकारी श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा परीक्षक श्री. शरद देशमुख, सहा. संचालक श्री. ललित खोब्रागडे, महापालिका सचिव सौ. प्राचक्ता कुलकर्णी, भांडार विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम, उद्यान अधिक्षक दिप्ती लाड, सहा.आरोग्य अधिकारी श्री. मनिष हिवरे, दिव्यांग कल्याण योजना विभाग प्रमुख श्री. राजेश घनघाव, मुख बाजार निरीक्षक श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री. एकनाथ पवार, कर निर्धारक व संकलक श्रीम. निलम कदम व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(छाया डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम अ‍ॅनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.